दैनिक

अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

● वर्ष १६ वे ● अंक २३२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१७ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


### दिवेआगर येथे

# संकष्टी चतुर्थीला होणार सुवर्ण गणेश मूर्तीची पुर्नप्रतिष्ठापना

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होणार सोहळा



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – कोकणातील प्रसिद्ध पर्यटन व धार्मिक स्थळ असलेल्या दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मूर्तीची पुनःप्रतिष्ठापना २३ नोव्हेंबर रोजी संकष्टी चतुर्थीच्या दिवशी होणार आहे. पु ना गाडगीळ या प्रसिद्ध सोने व्यापाऱ्यांकडे श्री सुवर्ण गणेश मूर्तीची पुनर्घडणावली करण्याचे काम दिले आहे. श्री गणेश मूर्तीच्या पुनःप्रतिष्ठापनेला उपमुख्यमंत्री अजित पवार व सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. पर्यटन पुन्हा नव्याने बहरणार अशी आशा व्यक्त केली जात आहे.

सन १९९७ साली दिवेआगर येथे श्री गणेश मूर्ती सापडली. मात्र मार्च २०१२ मध्ये मंदिरावर दरोडा पडून मूर्तीची चोरी करण्यात आली. संपूर्ण न्याय प्रक्रियेनंतर त्यानंतर तब्बल ९ वर्षानंतर सुवर्ण गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. संपूर्ण परिसरात आनंदाच वातावरण तयार झाले आहे. दिवेआगर मधील वैभव पुन्हा प्राप्त होणार असल्याने आता पर्यटकाच्या संख्येत देखील वाढ होणार आहे.

दिवाळी निमित्त दिवेआगर या प्रसिद्ध पर्यटन स्थळाला तब्बल ४० हजारहून अधिक वाहनांची नोंद झाली आहे. यातून जवळजवळ २ लाखाहून अधिक पर्यटकांनी भेट दिली आहे. श्री सुवर्ण गणेश मंदिर रस्ता डांबरीकरण, बसस्थानक निवारा शेड, नागरी सुविधा अंतर्गत तळाणी रस्ता, रोजगार निर्मितीसाठी समुद्रकिनारी चार गाळे उभारणी यातील काही कामे सुरू असून उर्वरित कामे लवकरच पूर्ण होतील, असे ग्रामपंचायत कडून सांगण्यात आले आहे. समुद्रापासून गावाचे संरक्षण होईल यासाठी धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरू आहे. सद्यस्थितीत ५ कोटी मंजूर निधीतून काम सुरू आहे. पुढे दोन टप्प्यात प्रस्तावित मागणी नुसार संरक्षण भिंत पूर्ण होईल. यामध्ये पहिल्यांदा ५ कोटी तर दुसऱ्या टप्प्यात २.५० कोटी मंजूर होऊन काम पूर्ण होईल. मूर्तीसाठी लॉकर हा सेन्सरमध्ये एक आधुनिक पध्दतीने बसणार आहे. मूर्ती संरक्षणसाठी सशस्त्र पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. सद्या मंदिराच्या चार ही बाजुंनी संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे.

### पनवेल महापालिकेला राष्ट्रपती पुरस्कारासाठी नामांकन जाहीर

# पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे आयुक्त गणेश देशमुख यांचे अभिनंदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगडसह कोकणात पहिल्या असलेल्या पनवेल महापालिकेला नुकताच राष्ट्रपती पुरस्कारासाठी नामांकन जाहीर झाले आहे, ही पनवेलवासियांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यामुळे पनवेल तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. पनवेल तालुका महासंघाचे जेष्ठ सल्लागार सुनील पोतदार, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर यांच्या उपस्थितीत पनवेल तालुका महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी त्या संदर्भातील अभिनंदन पत्र आयुक्त गणेश देशमुख यांना दिले.



पनवेल महानगरपालिकेचे कामकाज विकासात्मक लोकाभिमुक आहे. आजही महापालिकेच्या माध्यमातून समाजाभिमुख घेतलेल्या विविध निर्णयामुळे महापालिका प्रशासनाच्या कार्याचा ठसा जनमानसात उमटत आहे, पनवेल महापालिकेने स्वच्छता निर्मूलन, प्लास्टिक बंदी यासह अनेक लोकोपयोगी उपक्रम मोठ्या हिरीरीने पूर्णत्वास नेले आहेत, याची दखल देशाच्या राष्ट्रपती कार्यालयाने घेतली असून मुंबई, नवी मुंबई, ठाणे महापालिकेसोबतच पनवेल महानगरपालिकेला देखील राष्ट्रपती पुरस्कारासाठी नामांकन जाहीर झाले आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांचे विशेष कौतुक करताना रत्नाकर पाटील म्हणाले की, आयुक्त साहेब, आपण केलेल्या मौलिक कामगिरीमुळे पनवेलचे नाव देशपातळीवर निश्चितच उंचावले आहे. त्यामुळे समस्त पनवेलकरांचा ऊर अभिमानाने व स्वाभिमानाने भरून येत आहे, याचे श्रेय आपणास व आपल्या सर्व प्रशासन व कर्मचारी वर्गास जात असल्याचे त्यांनी आवर्जून अभिनंदन करताना सांगितले. यावेळी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार तथा दैनिक रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार, ज्येष्ठ सल्लागार तथा दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी तथा सचिव मयूर तांबडे, दैनिक रामप्रहरचे प्रतिनिधी तथा प्रसिद्धीप्रमुख नितीन देशमुख, दैनिक मुंबई चौफरचे प्रतिनिधी अरविंद पोतदार, दैनिक सामनाचे प्रतिनिधी संजय कदम, दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे प्रतिनिधी के. सी.सिंग, दैनिक कृषिवलचे प्रतिनिधी राजेश डांगळे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.



# लीना गरड यांचे भाजपमधून निलंबन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पक्षविरोधी कार्यवाही केल्यामुळे भाजपच्या तिकिटावर निवडून आलेल्या नगरसेविका लीना गरड यांचे भारतीय जनता पार्टीतून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे.



पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर खारघर प्रभाग पाच मधून नगरसेविका म्हणून लीना गरड विजयी झाल्या. मात्र त्यांनी सतत उघडपणे पक्षविरोधी कारवाई केली आहे आणि तशा सातत्याने तक्रारी विभागातील पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून पक्षश्रेष्टींकडे प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी लीना गरड यांना पक्षातून निलंबित केले आहे. त्या संदर्भात आज (दि. १६) निलंबन पत्र लीना गरड यांना पाठविण्यात आले आहे.

भाजपच्या नगरसेविका असतानाही लीना गरड यांनी महापालिकेच्या विविध सभांमध्ये विरोधी पक्षाला उघडपणे सहकार्य केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या विरोधात शहरात बॅनरबाजी करणे, तसेच पक्षाच्या विरोधात पत्रके काढून जनतेची दिशाभूल करणे, सोशल मिडियाच्या माध्यमातून पक्षाच्या विरोधात टीका– टिप्पणी करणे, महासभेच्या वेळी विरोधी पक्षाच्या बाकांवर बसून सत्ताधारी पक्षाविरोधात निदर्शने करणे, अशा अनेक पक्षविरोधी कारवायांमुळे पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम लीना गरड यांनी केले, त्यामुळे पक्षाकडून वारंवार समज तसेच चर्चेस बोलावून सुद्धा लीना गरड यांच्याकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही या उलट पक्षाची बदनामी करण्याचा सातत्याने त्या प्रयत्न करीत आल्या आहेत, त्यामुळे बेशिस्त वर्तनामुळे तसेच पक्षविरोधी कारवायांमुळे पक्षाला या संदर्भात कारवाई करण्यास भाग पडले आहे, त्यानुसार लीना गरड यांचे भाजपाचे प्राथमिक सदस्यत्व सहा वर्षांकरिता निलंबित करण्यात आले.

> निलंबनाबाबत मला अजून कोणतेही अधिकृत पत्र मिळाले नाही. त्यामुळे पत्र वाचल्याशिवाय प्रतिक्रिया देता येणार नाही. परंतु खारघर, कामोठा, कळंबोली, तळोजा व खांदा कॉलनी या सिडको कॉलनी परिसरामधून सर्वात जास्त मताधिक्य आणि सर्वात जास्त मतदान करून ज्या जनतेने मला निवडून दिले त्या सिडको वसाहतीतील जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी माझा लढा सुरूच राहील
>
> **: लीना अर्जुन गरड, नगरसेवक**
> **पनवेल महानगरपालिका**

## संक्षिप्त...

### समीर वानखेडेंनी घेतली मुंबई पोलीस आयुक्तांची भेट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अंमली पदार्थ विरोधी संस्था एनसीबीचे विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी आज मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नागराळे यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये सुमारे २५ मिनिटे बैठक चालली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समीर वानखेडे यांना कास्ट सर्टिफिकेटशी संबंधित चौकशीसंदर्भात बोलावण्यात आले होते. मुंबई पोलिसांची एसआयटी क्रूझ ड्रग्ज प्रकरणात कथित खंडणीचा तपास करत आहे. याच बरोबर, आणखी एक टीम वानखेडे यांच्या कास्ट सर्टिफिकेट संदर्भातही तपास करत आहे. याशिवाय, एनसीबीचे दक्षता पथकही वसुलीच्या आरोपांची चौकशी करत आहे. समीर वानखेडे यांच्या नेतृत्वाखालील एनसीबीचे पथकाने २ ऑक्टोबरला क्रूझवर छापा टाकून अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान, मॉडेल मुनमुन धमेचा, अरबाज मर्चंट आणि इतरांना ड्रग्ज बाळगल्याच्या आरोप–ाखाली ताब्यात घेतले होते. यानंतर, सर्वांना अटक करण्यात आली होती. याच प्रकरणातील प्रमुख साक्षीदार असलेल्या प्रभाकर साईलने समीर वानखेडे याच्यासह केपी गोसावीवर खंडणीचा आरोप लावला आहे.

# वेश्वी येथील ३ कोटी ४२ लाखांचा बर्फ कारखाना व शीतगृह प्रकल्प १२ वर्षे धुळखात



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील वेश्वी येथील ३ कोटी ४२ लाख रुपये खर्चाचा बर्फ कारखाना व शीतगृह प्रकल्प गेली १२ वर्षे धुळखात पडला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाचा वापर हा आंबट शौकीनानी आपल्या दारु आड्यासाठी बनविला आहे. महाराष्ट्र राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री अस्लम शेख यांनी सदर प्रकल्पाच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी उरण तालुक्यातील आगरी, कोळी, कराडी समाज बांधव करीत आहेत.

महाराष्ट्र राज्य मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास यांच्या आंधळा दळतंय आणि कुत्रा पिट खातय या कारभारामुळे हा प्रकल्प धुळखात पडला आहे. देशाला सर्वाधिक परकीय चलन मिळवून देणारा मत्स्य हा व्यवसाय आहे. परंतु या व्यवसायाला मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराची किड लागली आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून कोळी बांधव, मच्छिमार सहकारी संस्था यांना नौका बांधणीसाठी व मत्स्य प्रकल्पासाठी लाखो, करोडोंचा निधी उपलब्ध होऊन सुध्दा मत्स्य व्यवसायाला चालना मिळत नाही.

त्यात राज्यातील गोड्या पाण्याच्या बंद पडलेल्या १४ मच्छिमार सहकारी संस्थांच्या माध्यमातून ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप या अगोदर अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष दामोदर तांडेल यांनी केला होता. परंतु मत्स्य आयुक्तालयात काही अधिकारी हे एकाच जागेवर गेली अनेक वर्षे कार्यरत असल्या कारणाने मत्स्य विभागात होणाऱ्या भ्रष्ट कारभाराला सदर अधिकारी हेच पाठीशी घालत असल्याचा आरोप होत आहे.

उरण तालुक्यातील चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्थेसाठी राज्य सरकारने एन.सी.डी.सी. योजनेतून ३९ मार्च २००९ रोजी बर्फ कारखाना आणि शीतगृह उभारण्यासाठी ३ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्यानंतर राजमाता ...‍/२

### पनवेल तालुक्यातील खारघर खाडीमध्ये अनधिकृतपणे वाळू उपसा करणाऱ्यांवर

# जिल्हा प्रशासनाची धडक कारवाई ; दोन बोटी आणि वाळू हौद नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील खारघर खाडी भागात अनधिकृतपणे वाळू उपसा होत असल्याची खबर मिळताच जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव आणि पनवेल उपविभागीय अधिकारी, राहुल मुंडके यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तहसिलदार विजय तळेकर यांच्यासह मंडळ अधिकारी सुनील पाटील व इतर कर्मचाऱ्यांनी अनधिकृत गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर धडक कारवाई केली.

या कारवाईत या पथकाने दोन बोटी व वाळूचे हौद नष्ट केले. संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती पनवेल तहसिलदार विजय तळेकर यांनी दिली आहे.

# रिलायन्स विरोधातील प्रकल्पग्रस्त ४० आंदोलकांना रोहा कोर्टात हजर

**दै.रायगड नगरी । वाकण**

रिलायन्सच्या (आयपीसीएल) ५४७ प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व इतर काही मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांवर जमावबंदी आदेशाचे उल्लंघन, कोणत्याही प्रकारे सभेची परवानगी न घेता ध्वनीक्षेपकाचा वापर तसेच कोविड–१९ च्या अनुषंगाने सोशल डिस्टसिंगचे नियम न पाळता कोणीही मास्क न लावता कंपनी विरोधात संघटनेचे झेंडे हातात घेवून घोषणाबाजी केल्याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हे दाखल करण्यात आले होते. या आंदोलकांना रोहा येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात मंगळवारी(दि.१६) दुपारी हजर करण्यात आले. यामध्ये ४० पुरुष प्रकल्पग्रस्त आंदोलकांचा समावेश होता. याबाबतीत न्यायालयाचा निर्णय उशीरापर्यंत समजू शकला नाही.

रिलायन्स (पूर्वीची आयपीसीएल) कंपनीच्या चोळे ते नागोठणे परिसरातील बहुसंख्य प्रमाणपत्र धारक प्रकल्पग्रस्त आजही नोकरी पासून वंचित आहेत. याच प्रकल्पग्रस्तांनी नोकरीसह आपल्या अन्य मागण्यांसाठी भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या माध्यमातून व वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स गेट बंद आंदोलनाचा लढा सोमवारी (दि.१५) देण्याचे ठरविले होते. रिलायन्स कंपनीच्या मेन गेट पासून २०० मीटर अंतारापर्यंत प्रवेश करण्यास कंपनीने न्यायालयाकडून निर्बंध आणल्याने प्रकल्पग्रस्त आंदोलक मेन गेट जवळील कडसुरे गावाच्या प्रवेश द्वारात बसून हे आंदोलन सुरु ठेवले होते.

मात्र दिवसभरात कोणताच समाधानकारक तोडगा न निघाल्याने व आंदोलनस्थळी उपस्थित असलेले अतिरिक्त पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांनी विनंती करूनही संध्याकाळ पर्यंत हे आंदोलन मागे न घेतल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून आंदोलकांना सायंकाळी ५.३० वा. सुमारास ताब्यात घेण्यास सुरुवात केली. यावेळी ४० पुरुष व ३० महिला आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. नंतर त्यांना रोहा येथील मातोश्री मंगल कार्यालयात ठेवण्यात आले होते. त्यापैकी ३० महिला आंदोलकांना नोटीस देऊन त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देऊन सोमवारी रात्रीच सोडण्यात आले होते.



# शिवमय जीवनाची इतिश्री

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या निधनामुळे महाराष्ट्रात सतराव्या शतकानंतर पुन्हा एकदा अवतरलेला शिवकालच विरामला आहे. 'शिवाजी' हाच बाबासाहेबांचा श्वास आणि ध्यास होता. या जगाचा निरोप घेताना बाबासाहेबांच्या अर्धजागृत मनात काही रेंगाळत असेल तर ते शिवरायांचेच नाव, रूप आणि अलौकिक कर्तब असेल. 'विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म..' असे तुकोबांनी म्हटले आहे. बाबासाहेबांच्या बाबतीत 'शिवमय जग, मावळ्यांचा धर्म, भेदाभेद भ्रम, अमंगळ' असे झाले होते. शिवाजी हे एकच दैवत, शिवनाम हाच जप, शिवचरित्र हीच वाणी, शिवस्तुती हीच भक्ती आणि शिवमहिमा हेच स्तोत्र, असे बाबासाहेबांचे अवघे जीवन होते. 'अवघा रंग एक झाला, रंगी रंगला शिवरंग, मी तूपण गेले वायां, पाहता रायरीच्या राया' अशी अलौकिक पण चिकित्सक भावावस्था बाबासाहेबांनी जन्मभर अनुभवली, जपली. मनाच्या देव्हाऱ्यातील दैवत आणि त्याची नाना मिषाने पूजा बांधणारा भक्त यांचे असे अद्वैत लौकिक जगात किती दिसते? बाबासाहेबांनी शिवरायांची पूजा शब्दांनी बांधली. लेखणीने सजवली. गीतांनी गायली. नाट्याने रंगवली. कथांनी सजवली आणि शिवरायांना नैवेद्य म्हणून आपले जीवनच वाहून टाकले. या त्यांच्या अलौकिक ध्यासामुळे ते जिवंतपणीच दंतकथा झाले. त्यांचे निव्वळ दर्शन घ्यावे, त्यांच्या आशीर्वादाचा हात आपल्या डोक्यावर क्षणभर पडावा आणि शक्य झाले तर त्यांच्या तोंडून शिवस्मरणाचा एखादा पवित्र श्लोक कानी पडावा, इतकीच आस घेऊन शेकडो लहानथोर बाबासाहेबांकडे जात. त्यांच्या पायाशी बसत. कार्यक्रमांना यायची गळ घालत. रुग्णालयातले अखेरचे मोजके दिवस वगळता बाबासाहेबांनी गेल्या सहा-सात दशकांत कुणालाही अव्हेरले नाही. विन्मुख पाठवले नाही. त्यांच्या मनात अखंड चालू असणारा शिवनामाचा गजर कोणत्याही क्षणी मुखर होई आणि समोर चारजण असोत की चार हजार, मंत्रमुग्ध होऊन जात. बाबासाहेब शिवभक्त होते. मात्र, त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांची भक्ती कमालीची डोळस होती. महाराष्ट्राच्या किंबहुना भारताच्या इतिहासात 'राष्ट्रनायक' म्हणून सदैव पूजता, अनुसरता येईल; असा 'राजा शिवाजी'च आहे; हे बाबासाहेबांनी तारुण्यातच उमजले होते. इतिहासप्रेमी वडिलांचे बोट धरून भूतकाळाचा अनेक अंगांनी वेध घेत असताना बाबासाहेबांनी 'शिवाजी महाराज' सापडले आणि 'देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा' या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे त्यांनी महाराष्ट्रभूमीत शिवराय या दैवताचा गोंधळ घातला. ते गळ्यांत कवड्यांची माळ परिधान करून स्वत:ला 'गोंधळी'च म्हणवत. 'मी पंडित नाही, मी विद्वान नाही, मी संशोधक नाही; मी फक्त शिवरायांचा गोंधळी आहे.' असे ते म्हणत. यात अभिजात विनम्रता होती; तशीच त्यांच्या जीवनध्येयाची स्पष्टता होती. महाराष्ट्राला शिवाजी महाराजांच्या अभ्यासकांची परंपरा आहे. 'नेपोलियनची इंग्रजीत तीनशे चरित्रे आहेत; आपल्याकडे शिवाजी महाराजांची?' हा बाबासाहेबांचा नेहेमीचा खिन्न सवाल असे. ही कमतरता आपल्या परीने कमी करण्यासाठी बाबासाहेबांनी शिवचरित्र लिहिले. ते स्वत:कडे लीनता घेत असले तरी त्यांनी शिवकालाचा अफाट व्यासंग केला होता. उपाशी राहून दिवस दिवस सायकल दामटत कागदपत्रे शोधली होती. अपमान आणि फसवणूक सोसली होती. नागपूरचे गाजलेले पहिले शिवकथन आणि काही काळाने 'राजा शिवछत्रपती'चे राजहंस प्रकाशनाने काढलेले खंड; याआधीची शिवसाधना कमालीची खडतर होती. रोज नवी परीक्षा पाहणारी होती. पण बाबासाहेबांची मनोवस्था 'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार' अशी होती. महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षांत शिवनामाचा आणि शिवकाळाचा जो जागृत गजर नव्याने फुलला, त्याचे सर्वांत मोठे श्रेय बाबासाहेबांचे आहे. त्यांची ग्रंथसंपदा आणि व्याख्याने जोवर आपल्या सोबत आहेत; तोवर हा गजर कधीही उणावणार नाही. तो गजर महत्त्वाचा यासाठी की, त्यातच महाराष्ट्र आणि भारताच्या उत्कर्षाची बीजे आहेत. बाबासाहेब हे कायम सतराव्या शतकातच असतात, अशी त्यांची कधी गंमत आणि कधी चेष्टाही केली जायची. बाबासाहेब स्वत: अत्यंत मिश्कील स्वभावाचे असल्याने हसूनच ही शेरेबाजी ऐकत. मात्र, त्यांचे भूतकाळातील वास्तव्य हे भविष्याला आकार यावा, यासाठी होते. ओघवत्या मराठीत तासन् तास बोलणारे बाबासाहेब 'नॅशनल कॅरॅक्टर' हा शब्द मात्र अनेकदा आधी उच्चारत. मग म्हणत, 'राष्ट्रीय चारित्र्य' कुठेय? ते हवेय. शिवाजी महाराजांच्या गोष्टी, त्यांचे चरित्र आम्हाला यासाठी ऐकायचे, शिकायचे आहे. इतिहासाकडे पाहण्याचा बाबासाहेबांचा असा वर्तमान आणि भविष्यवेधी दृष्टिकोन होता. महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण गेल्या काही दशकांत बिघडत चालले आहे. विषयांची चर्चा करण्याऐवजी समाजमनात विषारी मुळ्या रुजविण्याचा मक्ता काहींनी घेतला आहे. या नव्या विषवल्लीचा फटका बाबासाहेबांनाही बसला. त्यांच्या शिवभक्तीवर शंका घेण्यापर्यंत काहींची मजल गेली. हा सारा शेणसडा बाबासाहेबांनी फार धीरोदात्तपणे आणि किंचितही संयम न सोडता सोसला. 'शिवसाधनेचा आरंभ करताना अपार ऐहिक यातना सोसल्या; आता निरोपाचा संधिप्रकाश खुणावत असताना ही सत्त्वपरीक्षा होते आहे,' असे बाबासाहेबांच्या मनात येत असणार. ते खिन्न होऊन जात; पण कधी संतापले नाहीत की अपशब्दांना उत्तरे देत बसले नाहीत. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा सारा जीवनप्रवास म्हणजे द्रष्टा शिवजागर होता. 'शिवाजी' हाच महाराष्ट्राचा कुळधर्म आणि कुळाचार आहे. तो नव्याने सांगणाऱ्या शिवयोग्याचे महानिर्वाण झाले असले तरी हे जागरण पुढेही होत राहील. बाबासाहेबांनी आपल्या साऱ्यांसाठी ठेवलेला तो अक्षय ठेवा आहे.

# मा.आ.डी.एन.चौलकर यांनी दिला मुरुड एस टी कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठींबा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनात विलिनीकरणासाठी सुरू असलेल्या एस टी कर्मचा-यांच्या संपाला आज नववा दिवस असून कोणत्याही कामगार संघटनांना अथवा राजकिय पक्षांना सोबत न घेता एस टी कर्मचा-यांनी स्वबळावर आपला लढा द्यावा.असे मत माजी आमदार डी.एन.चौलकर यांनी मुरुड मधील निवासस्थानी आयोजित बैठकीत व्यक्त केले.

आगामी निवडणुकांचे लक्ष नजरेसमोर ठेवून आपले इच्छित साध्य करण्यासाठी अशा वेळी विविध राजकीय पक्ष वा कामगार संघटना याचा फायदा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा कोणत्याही कामगार संघटनांना अथवा राजकिय पक्षांना सोबत न घेता एस टी कर्मचा-यांनी स्वबळावर आपला लढा दिला पाहिजे. असे माजी आमदार डी.एन.चौलकर यांनी सांगितले.

शासनात विलिनीकरणासाठी सुरू असलेल्या एस टी कर्मचा-यांच्या संपाला आज नववा दिवस असून सदरचा लढा हा संघटना-पक्ष विरहित फक्त आणि फक्त कामगारांनी एकत्र येऊन एकजुटीने लढा लढला जात असल्याचे एस टी कर्मचा-यांनी सांगितले तसेच जो पर्यंत शासनामध्ये विलिनीकरण होत नाही तोपर्यंत सर्व कर्मचाऱ्यांना निलंबित सेवा किंवा इतर कोणतीही कार्यवाही करण्यात आली तरी सुद्धा सुरू असलेले काम बंद आंदोलन मागे घेण्यात येणार नाही.असा निर्धार यावेळी मुरुड मधील एस टी कर्मचा-यांनी व्यक्त केला. आपणास कोणती मदत सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी माजी आमदार डी.एन.चौलकर यांनी दिले.

# राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे श्रीवर्धन बाजारपेठेत मंदी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महाराष्ट्रातील सर्व कर्मचार्यांनी पुकारलेल्या संपामुळे सामान्य जनतेचे मोठ्या प्रमाणावरती हाल होत आहेत. खाजगी बस व काही प्रायव्हेट गाड्या अव्वाच्या सव्वा पैसे आकारून प्रवाशांना मुंबई व पुणे या ठिकाणी नेऊन सोडत आहेत. महाराष्ट्र शासनाकडून संपावरती तोडगा काढणे विषयी कोणत्याही प्रकारची सकारात्मक कारवाई होताना दिसत नाही. परिवहन महामंडळाच्या कर्मचार्यांनी पुकारलेल्या संपामुळे श्रीवर्धन बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मंदी पाहायला मिळत आहे.

कोरोना महामारी मुळे राज्यातील शाळा जवळजवळ दोन वर्ष बंद होत्या. नुकत्याच शाळा सुरू करण्याविषयी राज्य शासनाने आदेश काढल्यानंतर शाळा व महाविद्यालये सुरू करण्यात आली होती. परंतु राज्यातील एसटीच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यामुळे खेडेगावातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. तर काही विद्यार्थी शाळा व महाविद्यालयात पोहोचू शकत नसल्याने विद्यार्थ्यांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

श्रीवर्धन शहरातील र.ना. राऊत विद्यालय त्याचप्रमाणे गोखले महाविद्यालय या ठिकाणी शेकडो विद्यार्थी तालुक्यातील विविध भागांमधून येत असतात. त्यांच्यासाठी एसटी महामंडळाच्या विशेष फेऱ्या देखील सुरू असतात. परंतु महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होत आहे.

# उल्हासनगरमध्ये वातावरण मित्र सक्रिय

**दै.रायगड नगरी । उल्हासनगर**

उल्हासनगर मनपा क्षेत्रातील हवाप्रदूषणावर वातावरण या स्वयंसेवी संस्थामार्फत बाबुराव खेडेकर आणि विनोद सेवलानी हे वातावरण मित्र म्हणून कार्यरत असून शहरातील हवा प्रदूषणाबाबत जनजागृती तसेच उपाययोजना याबाबत त्यांचा अभ्यास सुरू आहे. लवकरच शहरात मनपा आणि स्वयंसेवी संस्थांच्या तसेच लोकप्रतिनिधी यांच्या मदतीने एअर क्वालिटी मॉनिटर बसवण्यात येणार आहेत.

अनियोजित वाढणारा शहराचा विकास , वाढते नागरीकरण, वाहनांचा धूर, वायुप्रदूषण करणारे छोटे मोठे व्यवसाय यामुळे शहरातील हवा आणीबाणीची बनत आहे ज्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. याबाबत जागरूक नागरिक, डॉक्टर चिंता व्यक्त करत आहेत;

मात्र याबाबत सुनियोजित उपाययोजना करण्यावर वातावरण संस्थेचा भर असणार आहे. ज्या नागरीकांना या चळवळीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी ९९६७७२१९५० आणि ९९२२९९६६३३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचा आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# आदिवासी विभागाच्या पेण प्रकल्प नियोजन समितीचे अध्यक्ष सुपे यांचा राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आदिवासी विकास विभागाच्या रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील आदिवासी भागासाठी तयार केलेल्या पेण प्रकल्प नियोजन समितीवर अध्यक्ष बनलेले कर्जतचे दत्तात्रय सुपे यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. दत्तात्रय सुपे यांनी प्रकल्पावर नियोजन समिती अध्यक्ष बनल्यावर राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील आदिवासी विभागासाठी पेण एकात्मिक प्रकल्प कार्यालय काम करते.या प्रकल्पाच्या नियोजन समिती अध्यक्ष पदावर राज्याच्या महाविकास आघाडी सरकारने दत्तात्रय सुपे यांची निवड केली.मात्र राज्य सरकार मध्ये सत्तेवर असलेल्या तीन पक्षांनी प्रत्येक महामंडळ आणि अशासकीय समित्या यांचे वाटप केले आहे.त्यानुसार शहापूर प्रकल्पाचे अध्यक्षपद शिवसेनेकडे गेले आहे.

तर पेण प्रकल्पाचे अध्यक्षपद राष्ट्रीय काँग्रेसच्या वाट्याला गेले होते. मात्र पेण प्रकल्पावर अध्यक्ष बनलेले सुपे यांना राष्ट्रीय काँग्रेसच्या कोट्यातून अध्यक्ष बनविण्यात आले आहे.

त्यामुळे दत्तात्रय सुपे यांचा राजकीय प्रवास राष्ट्रीय काँग्रेसचा असावा म्हणून दत्तात्रय सुपे यांनी अन्य आदिवासी कार्यकर्त्यांसह राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव मोघे, राज्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, इंटकचे अध्यक्ष जयप्रकाश छाजेड यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बर्फ कारखाना व शीतगृह प्रकल्प १२ वर्षे धुळखात

विकास मच्छिमार सहकारी संस्थेने वेश्वी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर ७० मधिल दिड एकर जमीन क्षेत्रावर बर्फ कारखाना आणि शीतगृह प्रकल्प उभारण्याचे काम मोठा गाजावाजा करत हाती घेतले.

परंतु मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत उभा राहणा मत्स्य व्यवसायाचा बर्फ कारखाना व शीतगृह प्रकल्प गेली १२ वर्षे धुळखात पडून राहिला आहे. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या अधिकारी आणि राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्थेची चौकशी करावी अशी मागणी या परिसरातील आगरी कोळी कराडी बांधव करीत आहेत.

## लायन्स हेल्थ फाऊंडेशनचा नेत्ररोगांविरुद्धचा अभूतपूर्व लढा

# सुपर स्पेशालिटी नेत्र रुग्णालयासाठी सोगावला झाले भूमीपूजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबागने मोतीबिंदू आणि नेत्ररोगांविरुद्ध जो लढा उभारला आहे, तो अभूतपर्व आहे. रायगड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील ६५ हजार लोकांची तपासणी, ६ हजार नेत्रशस्त्रक्रिया, त्यातील ४५०० मोफत नेत्रशस्त्रक्रिया, महात्मा फुले जन आरोग्य योजना, पंतप्रधान जन आरोग्य योजना हा लायन्स हेल्थ फाऊंडेशनचा चार वर्षांतील आलेख कौतुकास्पद आणि अभिमानास्पद असल्याचे प्रशंसोद्गार लायन्स इंटरनॅशनल डायरेक्टर व्ही.पी. नंदकुमार यांनी काढले.



लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबाग अद्ययावत नेत्रचिकित्सा, शस्त्रक्रिया व नेत्रचिकित्सक प्रशिक्षण केंद्र सोगाव येथे उभारत आहे. या सुपर स्पेशालिटी नेत्ररुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठीचे भूमीपूजन रविवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०-३० वाजता करण्यात लायन्स इंटरनॅशनल डायरेक्टर व मणीप्पुरम गोल्ड कंपनीचे मालक व्ही.पी. नंदकुमार यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर एलसीआयएफ कॅम्पेन १०० एरिया लीडर हनुमान अगरवाल, मल्टिपल कौन्सिल चेअरमन राकेश चौमल, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लुनकरन तावरी, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर-१ मुकेश तनेजा, डिस्ट्रिक गव्हर्नर-२ अमरचंद शर्मा यांच्यासह लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबागचे अध्यक्ष अनिल जाधव, उपाध्यक्ष नितीन अधिकारी, सचिव प्रवीण सरनाईक, रिजन चेअरमन अरविंद घरत आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना व्ही.पी. नंदकुमार यांनी या सुपर स्पेशालिटी नेत्ररुग्णालयाच्या माध्यमातून नेत्रपेढी, डायबेटीसवर उपचार, डायलेसिसची सोय, तसेच इतरही वैद्यकीय सुविधा पुरवण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी हनुमान अगरवाल, राकेश चौमल, अनिल जाधव, लुनकरन तावरी, प्रवीण सरनाईक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तर आभार डिस्ट्रीक ट्रेझरर अनिल म्हात्रे यांनी मानले. या समारंभासाठी माजी प्रांतपाल बाबुराव पिसाळ, अशोक जोशी, राजेश प्रजापती, ओमप्रकाश अरोरा, के.जे. पॉल, डॉ. जयंत पारेख, संतोष चौहान, आरडीसीसी बँकेचे सीईओ प्रदीप नाईक, नयन कवळे, प्रदीप सिनकर, प्रवीण घरत, माजी सरपंच सुनील थळे, मापगाव उपसरपंच कुर व सदस्य, लायन्स क्लब अलिबाग, मांडवा, पोयनाड, डायमंड, पनवेल, पेण, नागोठणेचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रिती प्रधान यांनी केले.

मा.रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५७९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्रीमती.सविता संजय वाघे, वय : ४० वर्षे
२) करण संजय वाघे, वय : २० वर्षे
३) अर्जुन संजय वाघे, वय : १७ वर्षे
४) प्रतिक्षा संजय वाघे, वय : १६ वर्षे
५) प्रगती संजय वाघे, वय : १४ वर्षे
क्र.३ ते ५ अज्ञान पालन करणार आई
श्रीमती.सविता संजय वाघे
६) श्रीमती.पार्वती कृष्णा वाघे, वय : ६७ वर्षे
सर्व रा.आदिवासीवाडी (कोल्ही),
पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.संजय कृष्णा वाघे हे दि.२३/०८/२०२१ रोजी एम.जी.एम.हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.संजय कृष्णा वाघे व अन्य हिस्सेदारांचे लाभांत खालील वर्णनाचा भूखंड इरादीत झालेला आहे.

**भूखंड क्र.६ ए, सेक्टर क्र.१६, नवीन पनवेल (प), क्षेत्र ५००० चौ.मीटर**

अर्जदार हे कै.संजय कृष्णा वाघे यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१६/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी आमच्या अशिल मयत मैनाबाई कोक्या पाटील उर्फ मैनाबाई धर्मा गोसावी तर्फे वारस श्री.शंकर धर्मा गोसावी वगैरे ६, यांनी पुढे सविस्तर वर्णन केलेल्या भूखंडाबाबत व मिळकतीबाबत कै.सुका कोक्या पाटील तर्फे वारस श्रीमती.जनाबाई नामा पाटील वगैरे ८ यांच्या विरुद्ध पनवेल येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश सो. यांचे कोर्टात रेग्युलर मुकदमा क्र.३८६/२०२१ अन्वये ठरावाकरिता, वाटपाकरिता दावा भूखंडामधील हिस्सा वेगळा करून मिळण्यासाठी तसेच निरंतर मनाई हुकूमाकरिता दावा दाखल केलेला आहे. सदर भूखंडाचे व मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**प्रलंबित दाव्याचा विषय असलेल्या भूखंडाचे व मिळकतींचे वर्णन**

| नोड | सेक्टर नंबर | भूखंड क्रमांक | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक | ७ | ११ बीए | ८१० |

**मौजे : कुंडेवहाळ व मौजे : मानघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुंडेवहाळ | ६७ | १ | ०-६०.० | ११.३८ |
| २ | कुंडेवहाळ | ६४ | १ | ०-५३.० | १.३१ |
| ३ | कुंडेवहाळ | २४ | ४ | ०-११.० | ०.०० |
| ४ | मानघर | ७९ | ० | ०-१२.६ | १.४४ |
| ५ | कुंडेवहाळ | ३१ | ६ | ०-६९.० | १३.९४ |
| ६ | कुंडेवहाळ | ३१ | ४ ब | ०-१५.५० | ४.०० |

वर नमूद भूखंडाबाबत तसेच मिळकतींबाबत आमच्या अशिल म्हणजेच मयत मैनाबाई कोक्या पाटील उर्फ मैनाबाई धर्मा गोसावी तर्फे वारस श्री.शंकर धर्मा गोसावी वगैरे ६, यांनी त्यांच्या दावा भूखंडामधील १/२ हिश्श्याकरिता रे.मु.नं.३८६/२०२१ अन्वये दावा दाखल केलेला असून सदरचा दावा मे.कोर्टात प्रलंबित आहे.

तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेने वर नमूद भूखंडाबाबत व मिळकतींबाबत आमच्या अशिलांच्या लेखी संमती शिवाय कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नयेत. याउप्परही सदर भूखंडाबाबत अगर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला आणि त्यामुळे आमच्या अशिलांचे काही नुकसान झाल्यास सदर नुकसानीस त्या व्यक्तीस जबाबदार धरले जाईल. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
